१

# आंतरराष्ट्रीय कायदा
## (International Law)

आधुनिक काळामध्ये दळणवळणाच्या व संसूचनाच्या वेगवान साधनामुळे जगातील राष्ट्रांचे परस्पर संबंध निर्माण झाले आहेत व वृद्धिंगत होत आहेत. आज प्रत्येक राष्ट्राला काही बाबतीत दुसऱ्यावर अवलंबून राहावेच लागते. राष्ट्राच्या विचारसरणीत भिन्नत्व असते तसेच राष्ट्रांचे हितसंबंधही परस्पर पुरक किंवा विरोधी स्वरूपाचे असू शकतात. त्यामुळे या राष्ट्रात संघर्षाचे किंवा मित्रत्वाचे संबंध निर्माण होतील. जगातील सर्व राष्ट्रांमधून शांतता व सुव्यवस्था असावी, आपसातील संघर्षाचे प्रश्न युद्धा ऐवजी शांततामार्गे सुटावेत यासाठी ज्या नियमांची आवश्यकता भासते ते म्हणजेच आंतरराष्ट्रीय कायदे होत.

बेंथाम यांनी १७८० मध्ये आंतरराष्ट्रीय कायदा ही संज्ञा वापरली. ऑपेन हाईम यांनी 'इंटरनॅशनल लॉ' मध्ये त्याचे विश्लेषण केले.

### आंतरराष्ट्रीय कायद्याचा अर्थ व व्याख्या
### (Meaning and Definition of International Law)

**ओपेन हाईम** : (१९०५)

यांच्या मते, "पूर्वापार परंपरा आणि चालिरीतीवर आधारित असणारे असे नियम की ज्यांचे पालन परस्परांशी व्यवहार करताना सभ्यराष्ट्रे बंधनकारक मानून करतात. त्यांना आंतरराष्ट्रीय कायदा म्हणतात.'

**हंस केल्सन :**

"सभ्य राष्ट्रे ज्या आधारे परस्परांमध्ये व्यवहार ठेवू शकतात अशा नियम आणि सिद्धांतांच्या संग्रहाला आंतरराष्ट्रीय कायदा म्हणतात."

(Nature of International Law)

आंतरराष्ट्रीय कायद्याला अनेक आंतरराष्ट्रीय संबंधाचे अभ्यासक कायद्याची संज्ञा देण्यास तयार नाहीत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्याला कायदा मानणारा एक विचार प्रवाह आणि कायदा न मानणारा दुसरा विचार प्रवाह अस्तित्वात आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या स्वरूपाचा असा परस्पर विरोधी विचार सुरु होतो. अनेक विधिशास्त्रज्ञ आंतरराष्ट्रीय कायद्याला राष्ट्रीय कायद्याचे निकष लावून कायदा ही संज्ञा नाकारतात. अशा विचारांना ऑस्टिन विचार धारा या नावाने ओळखले जाते.

ऑस्टिन या ब्रिटिश विधीशास्त्रज्ञाने सार्वभौमत्त्वाच्या दृष्टिकोनातून कायद्याची व्याख्या केली. ऑस्टीनच्या मते, 'व्यक्तीच्या बाह्य वर्तणूकीसंबंधी सार्वभौम सत्तेने

केलेले नियम म्हणजे कायदा होय.'

या व्याख्येच्या आधारावर कायदा ही संज्ञा वापरावयाची ठरविल्यास आंतरराष्ट्रीय कायद्याला कायदा म्हणता येणार नाही. आंतरराष्ट्रीय कायद्याला कायदा न मानणाऱ्या विचारवंतात ऑस्टिन, हाब्ज, हॉलंड, विलोबी, झीमर, पुफेंडर इ. चा समावेश होतो. ते आपल्या विचारांचे समर्थन पुढील प्रमाणे करतात.

**(१) नीती नियमांचे स्वरूप :**

जॉन ऑस्टिन यांनी आंतरराष्ट्रीय कायद्याला आंतरराष्ट्रीय संबंधाचे नीती नियम मानले कारण हा कायदा कोणत्याही सार्वभौम सत्तेने तयार केलेला नाही. तो नैतिक नियमांचा संग्रह असून त्याचे पालन करणे ही प्रत्येक स्वतंत्र व सार्वभौम राज्याची नैतिक जबाबदारी असते. कायदा पालन न केल्यास दंडशक्तीचा वापर करता येत नाही. म्हणून आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप नीतीनियमा सारखे आहे.

**(२) सौजन्याचा आधार :**

आंतरराष्ट्रीय कायदा अंमलात आणणारी सर्वश्रेष्ठ सत्ता नाही. या कायद्याचे पालन करवून घेणारी सत्तीची यंत्रणा नाही. पोलिस किंवा सैन्यबलाचे पाठबळ नसल्यामुळे ते सौजन्यावरच आधारित आहेत असा हॉलंडने विचार मांडला.

**(३) कायद्याचे दुर्बल स्वरूप :**

कारण कायदा पालन करणे ऐच्छिक असते. त्यामागे दंड शक्तीचे पाठबळ नसते. तो कायदा राष्ट्रीय कायद्यासारखा श्रेष्ठ कायदा नसतो. त्याचे स्वरूप राज्या राज्यांमधील कायद्याचे असते. राज्यांवरील कायदा असे नसते. राष्ट्रीय कायद्याशी विसंगती असेल तर राष्ट्रीय कायदाच पाळला जातो. म्हणून आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप दुर्बल आहे.

**(४) संभ्रम निर्माण करणारे कायदे :**

कायद्याचे स्वरूप नि:संदिग्ध असते. या कायद्यात कोणती तत्त्वे समाविष्ट असावीत त्या बाबतीत राज्यांमध्ये एकवाक्यता असावी लागते. तशी एकवाक्यता नाही. कारण राज्या राज्यातील सर्वच परिस्थितीत भिन्नता दिसून येते. राज्य आपल्या सोईनुसार त्याचे पालन करते किंवा त्याकडे दुर्लक्ष करते. न्यायमुर्ती कोलरीज यांनी आंतरराष्ट्रीय कायदे संभ्रम निर्माण करणारे व अनिश्चित आहेत असे म्हटले ते योग्यच वाटते.

**(५) आदर्शवादी व काल्पनिक स्वरूप :**

शांततेच्या सर्वसाधारण परिस्थितीत आंतरराष्ट्रीय कायदा पाळला जातो.

परंतु युद्धकाळात त्याचे पालन होत नसल्याचा अनुभव आहे. त्यामुळे त्याची निरर्थकता लक्षात येते. म्हणून त्यांना आदर्शवादी व काल्पनिक कायदे असे टिकाकार संबोधतात.

**(६) लोकमताचे पाठबळ नसते :**

राष्ट्रीय कायदा हा लोकमताच्या पाठबळावर उभा असतो. आंतरराष्ट्रीय कायद्याला असे लोकमताचे पाठबळ उपलब्ध नसते. कारण विविध देशांनी वेगवेगळ्या विचार प्रणाली स्विकारल्यामुळे तत्त्वांच्या संदर्भात त्यांच्यात एकवाक्यता नसते. ज्याला लोकमताचा आधार नाही तो कायदाच असू शकत नसल्याचे मत लॉर्ड सॉलिसबरी ने म्हटले होते.

**(७) कायदेशीर सार्वभौमत्त्वाचा अभाव :**

ऑस्टिनच्या मतानुसार कायदा हा सार्वभौमत्त्वाचे आदेश असतो. कायद्याला वैधानिक मान्यता असते व त्याचे स्वरूप लिखित असते. आंतरराष्ट्रीय कायदा संमत करणारी वैधानिक सत्ता नसल्यामुळे त्याचे स्वरूप न्यायमुर्ती लोडर यांनी म्हटल्या प्रमाणे आंतरराष्ट्रीय कायदा हा मुख्यत्त्वे करून अलिखीत आणि मान्यता प्राप्त नसलेला कायदा आहे. अशीही या कायद्याच्या बाबत टीका केली जाते की, आंतरराष्ट्रीय कायदा विधी शास्त्राचे अन्याय अपत्य आहे.

## आंतरराष्ट्रीय कायद्याची उगमस्थाने किंवा स्त्रोत
## (Sources of International Law)

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विकासाला साह्यभूत ठरणाऱ्या घटकाला आंतरराष्ट्रीय कायद्याची उगमस्थाने किंवा स्त्रोत असे म्हणतात. या संदर्भात विविध अभ्यासकांनी विविध प्रकारचे विचार मांडले आहेत. कायदा पालनास बाध्य करणाऱ्या शक्तीला आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्त्रोत मानल्यास त्यात प्राचीन रूढी, परंपरा, करार, आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे निर्णय कायदेतंज्ञाची भाष्य या सर्वांचा समावेश होतो.

ओपेन हाईमने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उगमस्थाना विषयी कायदा पालन करवून घेण्याची शक्ती असे मत मांडले. मै लॉरेन्स ने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या उगमांचा अर्थ संकेताचे पालन करवून घेणे असा लावल्यास राष्ट्रांची सहमती हा स्त्रोत ठरतो. राष्ट्रांची सहमती अव्यक्त किंवा व्यक्त स्वरूपाची असू शकते. परंपरा हे अव्यक्त सहमताचे उदाहरण असून राष्ट्र राष्ट्रामधील समझोते दुसऱ्या व्यक्त सहमतीचे उदाहरण होय. आंतरराष्ट्रीय विधीज्ञाने ज्या उगमस्थानांना मान्यता दर्शविली त्यांचे विवेचन पुढील प्रमाणे करता येते.

### (१) संधी किंवा करार (Treaties) :

आंतरराष्ट्रीय संबंधाचे महत्त्वाचे उगमस्थान म्हणजे संधी किंवा करार होत. असे आंतरराष्ट्रीय करार द्विपक्षीय किंवा अनेक पक्षीय स्वरूपाचे असू शकतात. ज्या करारांद्वारे आंतरराष्ट्रीय कायदे निर्माण होतात त्यांनाच आंतरराष्ट्रीय कायद्याचा स्त्रोत मानले जाते. दोन राष्ट्राने केलेल्या कराराला इतर राष्ट्रे नंतर सहमती दर्शवितात. त्या मधून पुढे अशा तहांना किंवा करारांना आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप प्राप्त होते. युद्धाच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय कायदे जिनेव्हा आणि हेग परिषदेतून निर्माण झाले आहेत.

आधुनिक स्थितीमध्ये अशा करारांवर राष्ट्रप्रमुखाची स्वाक्षरी झाली असली तरी कायदे मंडळाची मान्यता मिळवावी लागते. व्हर्सायच्या कराराला प्रे. विल्सनची मान्यता असूनही काँग्रेसने संमती न दिल्यामुळे अमेरिका राष्ट्रसंघाची सदस्य होऊ शकली नाही. कायदे मंडळाच्या मान्यतेमधून आंतरराष्ट्रीय कायद्याला लोकमताचा आधार प्राप्त होतो.

राष्ट्रसंघ आणि संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती आंतरराष्ट्रीय परिषदातील करारामधून झाली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या चार्टरमध्ये आंतरराष्ट्रीय कायद्याची बिजे आहेत.

**(२) रूढी, परंपरा किंवा संकेत** (Coustoms or Conventions) :

सर्व उगमस्थानांमध्ये रूढी, परंपरा किंवा संकेत हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे सर्वाधिक जुने उगमस्थान आहे. इतिहासाच्या ओघात कालांतराने रूढी, परंपरा विकसीत होतात. तशाच परंपरा आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विकसीत होत असतात. राज्यांच्या परस्पर व्यवहाराला सोईस्कर ठरतील अशा रूढी, परंपरांना राज्याकडून मान्यता प्राप्त होत असते. त्यांना कालांतराने आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप मिळते. अशा रूढी परंपरामध्ये राजदूतांच्या संद्र्भात. तसेच रेडक्रॉसच्या वाहनावर आक्रमण करू नये. इ. जॉन वेस्टलेकने परंपरा अशी पद्धती आहे की ज्याचे पालन करणे अनिवार्य असल्याचे समाज स्विकारतो असे म्हटले. राजदूतांचे विशेष अधिकार राज्यांनी मान्य केल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्वरूपात त्याला मान्यता मिळाली. फेनविक च्या मते युद्ध संबंधी नियम असे होत. अशाच प्रकारची मते कॅबिट व ओपेन हाईमने मांडली आहेत.

एखाद्या खटल्याचा निर्णय देताना जेव्हा कायद्याचा आधार मिळत नाही तेव्हा न्यायाधीश रूढी परंपरांचा आधार घेतात. त्यालाच पुढे आंतरराष्ट्रीय नियमांचे स्वरूप प्राप्त होत असते.

**(३) कायद्याचे सामान्य सिद्धांत** (The General Principles of Law) :

हा कायद्याचा तिसरा स्त्रोत मानला जातो. आंतरराष्ट्रीय परिषदा आणि परंपरांना लक्षात घेऊन सामान्य सिद्धांत निर्माण केला जातो. उदा. दोन संघर्षकारी पक्षात न्याय देण्यासाठी तिसरा नि:पक्ष न्यायाधीश असावा. जर्मनी व पोर्तुगाल संबंधी पंचायत न्यायालयाने मत दिले होते की, 'जेव्हा संघर्ष सोडविण्यासाठी कायदा नसतो तेव्हा न्यायाधिशाने नि:पक्षपती नियम लावून आंतरराष्ट्रीय भावनेतून न्यायदान केले पाहिजे.'

**(४) न्यायालयीन निर्णय** (Judicial Decision) :

विविध राज्यातील न्यायालये आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयाद्वारे आंतरराष्ट्रीय कायद्यांचा अर्थ स्पष्ट केला जातो. त्यांनी दिलेल्या निर्णयातून आंतरराष्ट्रीय कायदा परिपूर्ण बनतो. कायद्याची संदिग्धता सामन्यायबुद्धीने न्यायदान करून दूर केली जाते. पुढे येणाऱ्या दाव्या संबंधीचे निर्णय अशा निर्णयावर कायद्याचा दर्जा मिळतो. प्रादेशिक सार्वभौमत्त्व, राज्याचे क्षेत्र, अलिप्तता या संबंधाच्या निर्णयातून कायद्यांना मदत झाली. अशा प्रकारे न्यायालयीन निर्णय हे एक उगमस्थान ठरते.

**(४) रोमन कायदा** (Roman Law) :

रोम साम्राज्यात व्यापारासाठी इतर देशातील नागरिक येत असत. त्या

वेळी रोमन व इतर नागरिकांचे संबंध निश्चित करणारे कायदे निर्माण झाले. कायद्यापुढे सर्व नागरिकांना समान मानण्यात आले. त्या प्रमाणे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सर्वराज्यांना समान मानले गेले. राष्ट्राराष्ट्रातील संबंध निश्चित करण्यासाठी रोमन कायद्यांचा आधार घेतला गेला. अशा प्रकारे प्रगत रोमन कायदा आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार ठरतो.

**(६) कायदे पंडितांचे ग्रंथ** (Writtings of Publicists) :

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विकासाला कायदे पंडितांच्या ग्रंथाने मौलिक योगदान दिले आहे. ओपेन हाईमने कायदे पंडितांचे निरीक्षण व नि:पक्ष भूमिका आंतरराष्ट्रीय कायद्याला सहाय्यभूत ठरल्याचे म्हटले आहे. अमेरिकेचे न्यायाधीश ग्रे यांनी निर्णय देतांना कायदा, करार यांचा आधार सापडत नाही तेव्हा रूढी, परंपरा आणि न्याय पंडीतांच्या मतांचा आधार घेतला पाहिजे. असे मत मांडले होते. कायदे कसे असावेत याचा ग्रंथामधून कायदे पंडितांनी विचार मांडलेला असतो. न्याय पंडितांमध्ये ग्रोशिअसचे 'युद्ध आणि शांतता' लॉरेन्स चा आंतरराष्ट्रीय कायद्याची मूलतत्त्वे यांचा उल्लेख अपरिहार्य ठरेल. तसेच मॉग्रेन्थॉ, केंट, जुशे, जेन्टलीय यांचे ही योगदान महत्त्वपूर्ण आहे.

**(७) आंतरराष्ट्रीय शिष्टाचार** (International Comity) :

स्वतंत्र व सार्वभौम राज्ये इतर राज्यांसोबत आपले संबंध मित्रत्वाचे व सौहार्द्राचे निर्माण करण्यासाठी जे शिष्टाचार पालन करतात त्यामधून आंतरराष्ट्रीय कायद्याचा उगम होतो. राजदूताच्या स्वागताचे नियम, राजनय प्रतिनिधी जकात करारातून मुक्त ठेवणे इ. निर्मिती अशा शिष्टाचारातूनच झाली आहे.

**(८) आंतरराष्ट्रीय कागदपत्रे** (International Papers) :

जगदविख्यात असणारे मुत्सद्दी, राजधुरीण यांनी विविध प्रसंगी व्यक्त केलेली मते तसेच त्यांचा परस्परांमधील पत्रव्यवहार हा आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार बनतो. राजदूत आणि सरकारमध्ये पत्रव्यवहार होत असतो. त्यात राजदूताला सूचना दिलेल्या असतात. परराष्ट्र धोरणाचे स्पष्टीकरणही असते. आंतरराष्ट्रीय प्रश्नावरही प्रकाश टाकलेला असतो. विल्सन, क्लेमेन्शु, चर्चील, रुझवेल्ट, पं.नेहरू, हेन्री किसींजर या सारख्यांची मते आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधार बनली.

**(९) आंतरराष्ट्रीय संघटना** (International Organisations) :

आजच्या शतकात आंतरराष्ट्रीय कायद्याचे महत्त्वाचे उगमस्थान म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटना होय. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाने आणि दुसऱ्या

## आंतरराष्ट्रीय कायद्याचे महत्त्व

दुसऱ्या महायुद्धानंतर अस्तित्वात असलेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेची आंतरराष्ट्रीय संबंधातील कामगिरी समाधान कारक आहे. युद्ध थांबविणे व जागतिक शांतता प्रस्थापितकरण्यात यश मिळाले आहे. जगातील जवळ पास सर्वराष्ट्रे संयुक्त राष्ट्रसंघटनाची सभासद आहेत. सभासदत्व स्विकारताना या राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या पालनाची हमी दिलेली असते. जागतिक लोकमत या कायद्यांच्या अनुकूल आहे. कायदा पालन न करणाऱ्या राष्ट्रांना इतर राष्ट्रांचा रोष पत्करावा लागतो. आवश्यकतेनुसार त्या राष्ट्रांवर कार्यवाही देखील केली जाते. त्यामुळे आज आंतरराष्ट्रीय कायद्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याचे महत्त्व पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

### (१) सुव्यवस्थित व मैत्रीपूर्ण संबंध :

आंतरराष्ट्रीय संबंध अधिक सुव्यवस्थित व सुरळीत करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याचा आधारच उपयुक्त ठरतो. राज्या राज्यामधील आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक संबंध सतत वाढत आहेत. त्या संबंधात सुव्यवस्था निर्माण करणे व दोन किंवा अधिक राज्यात सामंजस्य निर्माण करण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय कायद्याद्वारे केले जाते.

### (२) राज्यांमधील व्यापारी संबंध :

राज्या राज्यातील व्यापार विषयक संबंध सुव्यवस्थित होण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायदा आवश्यक असतो. व्यापारी संबंध द्विपक्षीय व्यापार विषयक संबंधातून निर्माण होतात. व्यापार विषयक अनेक करारांनाच आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यामुळे आंतरराष्ट्रीय विमानसेवा, सागरी मार्ग, जल वाहतूक आंतरराष्ट्रीय पोस्टल सेवा आदिंचे संचालन व्यवस्थित होऊ शकेल.

### (३) राज्यांची बदलती भूमिका :

आंतरराष्ट्रीय कायदा हा कायदा आहे का? या संदर्भात मतभेद असूनही जगातील बहुतांश राष्ट्रांनी या कायद्यांना मान्यता दिली आहे. या कायद्याने युद्ध नियंत्रित केले आहे. युद्धभूमीवरील जखमींची सेवा, रासायनिक अस्त्रांचा वापर,

युद्धबंदींना द्यावयाची वागणूक यामध्ये आंतरराष्ट्रीय कायद्याने अमानुषता कमी करण्यास मदत केली.

संयुक्त राष्ट्र संघटनेने 'मानवी अधिकाराच्या जाहिरनाम्यातून' मानवी समूहाला किमान कोणते मानवी अधिकार असले पाहिजेत ते स्पष्ट केले. त्यामुळे किमान मानवी अधिकारांची उपलब्धी राज्यांनी आपल्या नागरिकांना करून दिली हे या कायद्याचे महत्त्वाचे योगदान होय.

**(४) आंतरराष्ट्रीय संघर्षाचे नियंत्रण :**

अंमलबजावणीच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अनेक मर्यादा आहेत. तरीही या कायद्याचे पालन होते. क्विन्सी राईट ने 'आंतरराष्ट्रीय कायदे हे सार्वभौम राष्ट्रांना विश्वसमुदायात परिवर्तीत करतात' असे म्हटले त्याचे प्रत्यंतर येत आहे. जर राज्यांनी आपल्यावर स्वत: अंशी बंधने घालून घेतली तर जगात स्थाई शांतता प्रस्थापित होईल. आंतरराष्ट्रीय कायद्याअभावी जागतिक शांतता धोक्यात येईल असे काही विद्वानांनी मत मांडले आहे. थोडक्यात आंतरराष्ट्रीय कायदा वैधानिक व्यवस्था निर्माण करतो.

**(५) वैज्ञानिक व तांत्रिक विकास :**

पूर्वी आणि आजच्या युगात महदंतर निर्माण झाले आहे. आजच्या युगाला 'विज्ञान युग' म्हणून संबोधले जाते. मानवाने विज्ञानाच्या क्षेत्रात एवढी प्रगती केली आहे की त्याचा जसा मानवी जीवनाला सदुपयोग होऊ शकतो तसा दुरुपयोग होण्याची देखील शक्यता असते. म्हणून विज्ञान 'शाप की वरदान' असा विचार करण्याची जगावर वेळ आली आहे. सर्वच वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतिचा मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी उपयोग व्हावा यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याची भूमिका व योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकास व संशोधनाला आंतरराष्ट्रीय कायदा सहाय्यभूत ठरला आहे. अंतराळक्षेत्र, महासागरातील खनिज संपत्ती, नैसर्गिक साधन सामुग्री, सागरी सिमा या संबंधीचे आंतरराष्ट्रीय कायदे निर्माण झाले आहेत.

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय कायदे जागतिक राष्ट्रांत युद्ध थांबविणे, सामंजस्य व शांतता निर्माण करणे, वैज्ञानिक व तांत्रिक विकास, व्यापार वृद्धी, मानवीय दृष्टिकोनाची निर्मिती करण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे ठरत आहेत.

## संहितीकरणाच्या मर्यादा

आंतरराष्ट्रीय कायद्याचे संहितीकरण करणे ही फ़ार कठीण बाब आहे. आधुनिक काळातील स्पर्धात्मक कायदे आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचा आशय यांचा विचार केल्यास संहितीकरण करणारी व्यक्ती अमूर्त कल्पनांवर भर देईल. त्यामुळे राष्ट्रांना सर्वाधिक मान्य असलेला कायदा समजणे कठीण होईल असे ब्रायर्ली यांचे मत आहे. ही संहितीकरणावरील मर्यादा आहे.

सर सिसिल हर्स्टला वाटते क़ी संहितीकरण आंतरराष्ट्रीय बैठकीत केले जाईल. तेथे संबंधित राष्ट्रे आपापल्या कायद्यांचा पुरस्कार करतील. या प्रतिनिधीत एकमत न झाल्यास संहितीकरणाची समस्या निर्माण होईल. तसेच राज्याची समानता व सार्वभौमत्त्वाचा प्रश्न शिल्लक असेल.

आंतरराष्ट्रीय कायद्या संबंधीच्या वादग्रस्त विषयांवर सर्वांचा समन्वय करणे व सर्व संमत नियम तयार करणे ही अत्यंत कठीण गोष्ट आहे.

संहितीकरण करण्याचे कार्य हे तांत्रिक स्वरूपाचे असते. कायदेपंडित हे कार्य योग्यरित्या करू शकतात. परंतु राजनितिज्ञाकडून हे कार्य केले जाते. त्यामुळे अनेक कायदेशीर अडचणी उद्‌भवतात.

अशा प्रकारे संहितीकरणाच्या मर्यादा निर्माण झालेल्या आहेत. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संहितीकरणाच्या अडचणी असून देखील राज्यांच्या परिषदांमधून आंतरराष्ट्रीय कायद्यात एकता आणि निश्चितता आणण्याचा प्रयत्न व्हावयास हवा असे ओपेन हाईन व फेनविकला वाटते. त्यांनी संहितीकरणाच्या अडचणीवर मात करण्यासाठी दोन गोष्टी सूचविल्या. एक म्हणजे राष्ट्रांत मतभेद नसलेल्या कायद्याचे संयुक्तराष्ट्र संघटनेने संहितीकरण करावे. आणि दुसरे म्हणजे मतभेद असलेल्या कायद्याचे संहितीकरण संबंधीत राष्ट्रांनी एकत्रीत येऊन सर्व संमतीने करावे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायदा हा परिणामकारक व जगाला मार्गदर्शक ठरू शकेल.

## आंतरराष्ट्रीय कायद्याच्या मर्यादा

आधुनिक काळामध्ये आंतरराष्ट्रीय कायद्याला विशेष महत्त्व आहे. कारण आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे ते एक महत्त्वाचे साधन ठरते. आंतरराष्ट्रीय कायद्याचा प्रभावीपणे उपयोग होण्यासाठी त्यात काही सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. कायद्याच्या प्रक्रियेत कायदा निर्मिती, अंमलबजावणी आणि अन्वयार्थ लावण्याकरीता कायदे विभाग, कार्यकारी विभाग आणि न्याय विभाग या तीन स्वतंत्र

यंत्रणा असाव्या लागतात. त्या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या बाबतीत अस्तित्वात नसल्यामुळे कायद्याच्या बाबतीत काही मर्यादा पडतात. कायदा सुस्पष्ट व नि:संदिग्ध असावा लागतो. त्या दृष्टीने त्याचे विवेचन पुढील प्रमाणे करता येईल.

**(अ) आंतरराष्ट्रीय कायद्याच्या निर्मितीसंबंधी मर्यादा :**

आंतरराष्ट्रीय कायद्याचे प्रथा व संकेत आणि आंतरराष्ट्रीय करार ही प्रमुख उगमस्थाने आहेत. त्यावर आधारित संहितीकरण केले गेले. परंपरांचा अर्थ लावण्याच्या संदर्भात राज्या राज्यात मतभेद निर्माण होतात. त्याच प्रमाणे संहितीकरण केले तरी कायदा मान्य अथवा अमान्य करणे प्रत्येक राज्याच्या इच्छेचा भाग असतो. आंतरराष्ट्रीय कायद्यांना मान्यता देणारी राष्ट्रे कायद्याचा अर्थ लावण्याचा अधिकार अबाधित ठेवत असतात. त्यामुळे संहितीकरण होऊन देखील समान अर्थ मान्य करण्याची शाश्वती नसते.

संधी किंवा परिषदा हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे महत्त्वाचे उगमस्थान आहे. परिषदेत सहभागी होणारी राष्ट्रे परिषदांमधून मंजूर झालेले ठराव मान्य किंवा अमान्य करण्याचा अधिकार असावा अशी भूमिका ठेवतात. त्यामुळे परिषदेतील कायद्यांना सर्वांची मान्यता मिळण्याची शाश्वती नसते. परिषदेत सामिल न झालेली राष्ट्रे बंधनकारक मानणार नाहीत त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्याला मर्यादा येते.

**(ब) आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अंमल बजावणीची मर्यादा :**

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अंमलबजावणीची मर्यादा ही अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे. कारण अंमलबजावणी करणारी प्रभावी अशी यंत्रणा इथे कार्यरत नसते. राज्यांचे सहकार्य आणि संदिच्छेवरच अंमलबजावणी अवलंबून असते. संयुक्त राष्ट्र संघटना आपल्या सदस्य राष्ट्रांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी करू शकते. परंतु त्यासाठी सदस्य राष्ट्राकडून तशा कार्यवाही संबंधीची मागणी द्यावी लागते.

**(क) न्यायदाना संबंधीच्या मर्यादा :**

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या न्यायदाना संबंधीच्या मर्यादा पुढील प्रमाणे आहेत.

**(१) विकेंद्रित न्याय यंत्रणा :**

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संदर्भात उद्‌भवणारे दावे स्वतंत्र राज्यातील न्यायालया समोर सुनावणी करिता येतात. असे दावे आंतरराष्ट्रीय न्यायालयात ही दाखल करता येतात. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अनुषंगाने राज्याने केलेल्या कायद्यानुसार न्यायालय निर्णय देत असते. राज्याच्या न्यायालयाच्या निर्णयावर अपील करता येत नाही.

आंतरराष्ट्रीय न्यायालय जागतीक व सर्वश्रेष्ठ न्यायालय नाही. त्यामुळे

त्याचे निर्णय राज्यातील न्यायालयावर बंधनकारक नसतात. अशा प्रकारे न्यायालयीन निर्णयात एकरूपता रहात नाही.

**(२) आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे अधिकारक्षेत्र :**

कोणत्याही राज्याने आंतरराष्ट्रीय प्रश्नासंबंधीचा वाद आंतरराष्ट्रीय न्यायालयापुढे नेला पाहिजे अशी सक्ती करता येत नाही. ज्या संबंधी राज्याची मान्यता असेल असेच खटले दाखल केले जाऊ शकतात. परंतु या न्यायालयाने दिलेला निर्णय मान्य करण्याची त्यांच्यावर सक्ती नसते. राज्यांच्या मान्यतेवरच ते अवलंबून असल्याने मर्यादा येते.

**(३) अन्वयार्थ लावण्याचा अधिकार :**

आंतरराष्ट्रीय कायदा राज्यांच्या परस्पर व्यवहारासंबंधीचा कायदा असतो त्यामुळे त्याचा अर्थ लावण्याचा राज्यांना अधिकार प्राप्त होतो. अंमलबजावणी आणि अन्वयार्थ लावण्याचा अधिकार राज्याला मिळत असल्यामुळे राज्य त्याचा उपयोग आपल्या हिताकरिता करू शकतात ही मर्यादा येते.

**(४) न्यायालयीन चौकशीची मर्यादा :**

प्रत्येक स्वतंत्र राज्य सार्वभौम मानले जाते. त्यामुळे एखादा तंटा हा न्यायालयीन चौकशीला योग्य आहे का ते राज्ये ठरवितात. राज्याच्या संमती शिवाय चौकशी करता येत नाही. आंतरराष्ट्रीय कायद्यांबाबत कार्यवाही होऊ शकत नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रश्नांबाबत न्यायालयीन चौकशीला आपोआपच मर्यादा पडते.

**(ड) आंतरराष्ट्रीय कायद्याची व्याप्ती व संदिग्धता :**

अलीकडे आंतरराष्ट्रीय कायद्याची व्याप्ती प्रचंड प्रमाणात वाढली आहे. तरी देखील अजूनही काही विषय या कायद्याच्या कक्षेबाहेर आहेत. उदा. स्थलांतरीतांचे प्रश्न, नागरिकांना मिळणारी वागणूक इ. ब्रेअर्ली तर म्हणतात की, 'आर्थिक क्षेत्रासारखे महत्त्वाचे क्षेत्राचे अधिकार राज्यांकडेच आहेत. जागतिक तंटे उद्‌भवण्याचे महत्त्वाचे आर्थिक कारणच बाजूस राहिले आहे. तसेच आंतरराष्ट्रीय कायद्याचे संहितीकरण झाले असले तरी ते संदिग्ध स्वरूपाचे आहेत. राज्यच त्यांचा आपल्या सोयीनुसार अर्थ लावतात.

**(इ) कायद्यांचा उद्देश्य व स्वरूप :**

राज्यांमधील व्यवहाराचे नियमन करणे हा आंतरराष्ट्रीय कायद्याचा महत्त्वाचा हेतू आहे. परंतु नागरिकांच्या कर्तव्यासंबंधीचे मतभेद विचारवंतात अजूनही कायम आहेत. न्युरेंबर्ग खटल्या पासून हा वाद आहे. युद्ध, अपराधी, गुन्हेगार ठरू शकतात